MHKO150000142023

फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (१) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – अ.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.**

( समक्ष – आर. पी. थोरे )

**न्यायनिर्णय तारीख – ११ एप्रिल, २०२६.**

नि.फौ.प्र.क्र. २/२०२३. निशानी क्र. /ब.

**प्रथम खबरेचा तपशील – अप. क्रमांक– १०५/२०२२. पोलिस ठाणे – आजरा.**

**गुन्हा – भा.द.वि.सं. कलम ३२३, ३२४, ५०४ आणि ५०६ सह ३४.**

**फिर्यादी – महाराष्ट्र सरकार.**
तर्फे – पोलीस स्थानक अधिकारी,
आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.
**मुळ फिर्यादी– शिवराज भैरु मगदूम.**
वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. निंगुडगे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे – श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**आरोपी – १. जोतिबा उर्फ आप्पाजी कलगोंडा मगदूम.**
वय – ५९ वर्षे, व्यवसाय – शेती,
**२. करवीर जोतिबा मगदूम.**
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – शेती,
दोघे रा. तेरणी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**आरोपीं तर्फे – श्री. डी. जे. देसाई, वकील.**

**गुन्ह्याचा तपशील –**

फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (२) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – ब.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | – | २८.०६.२०२२ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | – | २८.०६.२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | दोषारोप दाखल तारीख | – | ०३.०१.२०२३ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | – | ०३.०१.२०२३ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | – | १६.०३.२०२३ |
| ६. | युक्तीवाद पुर्ण केल्याची तारीख | – | १०.०३.२०२६ |
| ७. | निकालासाठी राखीव ठेवल्याची तारीख | – | ११.०४.२०२६ |
| ८. | निकाल तारीख | – | ११.०४.२०२६ |
| ९. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | – | अंतिम आदेशा प्रमाणे. |
| १०. | कालावधी | – | ०३ व., ०३ म., ०८ दि. |

**आरोपीचा तपशील –**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक आणि जामीन तारीख | गुन्हा | शिक्षा / मुक्तता | शिक्षा | बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जोतिबा उर्फ आप्पाजी मगदूम. | दि. ०३.०१.२०२३ | भा.द.वि.कलम ३२३, ३२४, ५०४ आणि ५०६ सह ३४ | दोष सिध्दी. | परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत सुटका. | निरंक |
| २. | करवीर जोतिबा मगदूम. | | | | | |

**न्यायनिर्णय – (आज दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजी)**

प्रस्तुतचे प्रकरण हे आरोपीं विरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३, ३२४, ५०४ आणि ५०६ सह ३४ अन्वये चालविण्यात आले आहे.

**सरकार पक्षाचे कथन –**

**२.** फिर्यादीने दि.२८.०६.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र.१ कडे त्याच्या गायीच्या विक्रीचे राहिलेल्या पैशांची मागणी केली असता, त्याने त्याची गळपट धरली होती. फिर्यादी व आरोपी क्र.१ मधील भांडणे नारायण मगदूम याने सोडवली होती. त्यानंतर साधारणतः दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीने शेतातून घरी

येऊन परडयात वैरणाचा भारा टाकल्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांनी अनोळखी इसमांसह त्याच्या अंगावर धावून जाऊन, 'तुझे कुठले पैसे' असे म्हणून लाथाबुक्यांनी व कोळप्याच्या लाकडी मुठीने त्याच्या डोक्यात, डाव्या डोळयाच्या बाजूला आणि उजव्या व डाव्या पायांवरती मारहाण व शिवीगाळी करुन पैसे मागितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली होती. सबब, फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीं विरुध्द प्रस्तुत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**तपास व दोषारोपपत्र –**

**३.** फिर्यादीच्या तक्रारी वरुन प्रथम खबर क्र.I १०५/२०२२ नोंदवण्यात येऊन सदर गुन्हा तपासकामी पोलिस हवालदार पी. जी. गुरव यांच्याकडे देण्यात आला होता. त्यांनी तपासादरम्यान आरोपींना ४१–अ प्रमाणे नोटीस देऊन घटनास्थळ व जप्ती पंचनामा करुन जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवले आहे. त्यांना साक्षीदारांच्या जबाबातून मिळून आलेल्या पुराव्या वरुन त्यांनी सदर दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

**दोषारोप, निवेदन व आरोपींचा बचाव –**

**४.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांच्या वरती माझ्या पुर्वपिठासिन अधिका–यांनी (नि.क्र.१०) प्रमाणे दोषारोप ठेवून त्यांना समजावुन सांगितला असता, त्यांनी (नि.क्र. ११ व १२) वरील निवेदना नुसार गुन्हा केल्याचे नाकारुन संपरिक्षेची मागणी केली आहे. सरकार पक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीं विरुद्ध त्यांना गुन्हयात गुंतवणारा पुरावा आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे नि. क्र.४० व ४१ प्रमाणे नोंदविण्यात आले असून त्याद्वारे त्यांनी खोट्या गुन्ह्यात गोवल्याचा बचाव घेतला आहे.

**विचाराधीन मुद्दे व त्यांचे निष्कर्ष –**

**५.** सरकारी वकील व आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. उप्लब्ध पुराव्यावरुन व दोन्ही बाजुंच्या वकीलांच्या युक्तिवादावरुन खालील मुद्दे या न्यायालयाच्या चर्चेसाठी उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष मी कारणांसह खालील प्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला लाथाबुक्यांनी दुखापत केल्याचे सिध्द केले काय ? | . . **नाही.** |
| २. | सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला कोळप्याच्या लाकडी दांडयाने मारहाण केल्याचे सिध्द केले काय ? | . . **होय.** |
| ३. | सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्देशाने त्याला शिवीगाळी केल्याचे सिध्द केले आहे काय ? | . . **नाही.** |
| ४. | सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीवरती फौजदारीपात्र धाकदपटशहाचा वापर करुन त्याला जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सिध्द केले आहे काय ? | . . **नाही.** |
| ५. | अंतीम आदेश काय ? | . . **अंतीम आदेशाप्रमाणे** |

**कारणेमिमांसा –**

६. आरोपीं विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने परिशिष्ठातील साक्षीदारांच्या यादी प्रमाणे एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविली असुन पुराव्याच्या यादीतील कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे. आरोपींनी त्यांच्या बचावामध्ये कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ४ साठी –**

७. वादमुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे घटनेची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे विचारात घेतले आहेत. सरकार पक्षाने भा. द. वि. सं. कलम ३२३ चा गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपींनी फिर्यादीला इच्छापुर्वक दुखापत केल्याचे, भा. द. वि. सं. कलम ३२४ चा गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपींनी फिर्यादीचा

मृत्यू संभव आहे अशा घातक हत्याराने जखमी केल्याचे, भा. द. वि. सं. कलम ५०४ चा गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपींनी फिर्यादीच्या हातून गुन्हा घडण्यासाठी प्रक्षोभित केल्याचे आणि भा. द. वि. सं. कलम ५०६ च्या गुन्हयासाठी आरोपींनी फिर्यादी वरती फौजदारी पात्र बलाचा वापर करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची बाब संशया पलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

८. त्या अनुषंगाने पटलावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी शिवराज (सा. क्र.३) याने त्याच्या पुराव्यात, एप्रिल २०२२ मध्ये पैशांच्या अडचणीमुळे त्याने आरोपी क्र.१ ला त्याच्या गाभण गायीची ४५,०००/– रुपयांना विक्री केल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, आरोपी क्र.१ ने टप्याटप्याने त्याला ४०,०००/– रुपये दिल्यानंतर तो उर्वरीत ५,०००/– रुपये देण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे दि.२८.०६.२०२२ रोजी आरोपी क्र.१ त्याचा चुलता नारायण याची गाय खरेदी करण्यासाठी आला असता, त्याला भेटून उरलेले पैसे आणि चुलत्याच्या गायीचे पैसे ताबडतोब द्यायला सांगितल्याच्या कारणावरुन त्याने त्याची गळपट्टी धरुन, 'तुझे कुठले पैसे' असे म्हणाल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, सदर भांडणे चुलते नारायण यांनी सोडवल्या नंतर तो दुपारी ०२.३० वाजता शेतातून वैरण घेऊन घराच्या परडयात आल्यावर आरोपी क्र.१ हा इतर दोन लोकांसोबत उभा असताना, आरोपी क्र.१ व २ यांनी, *'तुझे कुठले पैसे'* असे म्हणून आरोपी क्र.२ ने कोळप्याच्या लाकडी दांडक्याने त्याच्या डोक्यावर दोन ते तीन वेळा आणि त्याच काठीने डाव्या डोळयाजवळ व दोन्ही पायांवर मारल्याचे सांगितले आहे.

९. त्याने पुढे, आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे आरडाओरडा केल्यावर गावातील मधुकर देसाई, धनाजी देसाई, छाया परीट आणि त्याची आई घटनास्थळी आल्यावर आईने त्याला सोडवून घेतल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, आरोपींनी त्याला पुन्हा पैसे मागितल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे घटनेबाबत पोलिस पाटलाकडे तक्रार दिल्यावर दुपारी ०४.०० ते ०४.३० वाजेच्या दरम्यान पोलिस ठाण्यात येऊन वैद्यकीय तपासणी करुन आल्यावर तक्रार दिल्याचे सांगून वस्तू क्र.अ वरील कोळप्याची काठी ओळखली आहे. त्याने आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये त्याच्या घराच्या

आजूबाजूला दादू व बसवंत भोसले यांची घरे असून समोर बसवेश्वर मंदिर असल्याचे कथन केले आहे. त्याने मधुकर देसाई, धनाजी देसाई व छाया परीट यांची मंदिराच्या बाजूच्या गल्लीत घरे असल्याचे आणि आरोपी जनावरांच्या व्यापारामुळे त्याच्या गावात येत असून त्यांनी कोणाचेही पैसे बुडवले असे ऐकले नसल्याचे मान्य केले आहे. त्याने पुढे, घटनेच्या वेळी तो त्याच्या म्हशीला पाणी पाजण्यासाठी घेऊन जात असताना, आरोपींनी खरेदी केलेली गाय गाडीमध्ये भरताना त्याची म्हैस बुझून तीने त्याला ओढत नेल्यामुळे त्याला जखमा झाल्याचे नाकारले आहे.

**१०.** सरकार पक्षाने फिर्यादीच्या पुराव्याला दुजोरा देण्यासाठी तपासलेले साक्षीदार छाया (सा. क्र.४) हिने सरकार पक्षाला कोणतेही सहकार्य केलेले नाही. साक्षीदार मधुकर (सा. क्र.५) याने, घटनेच्या दिवशी तो दुकानात जात असताना फिर्यादी व आरोपींची बोलाचाली चालू असल्यामुळे त्यांना थांबा असे म्हणाल्याचे सांगून मूळ घटने बाबतचा पुरावा दिलेला नाही. तसेच घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार कृष्णा (सा. क्र.१) आणि शिवाजी (सा. क्र.२) यांनी देखील सरकार पक्षाला सहकार्य केलेले नाही. सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारांच्या घेतलेल्या उलट तपासातून देखील उपयुक्त ठरणारी कोणतीही बाब पटलावरती आली नाही.

**११.** वैद्यकीय अधिकारी ऋतूराज (सा.क्र.६) याने दि. २८.०६.२०२२ रोजी ग्रामीण रुग्णालय, आजरा येथे कार्यरत असताना पोलीसांच्या यादी सोबत आलेल्या फिर्यादीची वैद्यकीय तपासणी केल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, सदर तपासणी मध्ये फिर्यादीच्या डोक्यावरती, उजव्या मांडीवरती, डोळयाजवळ, पोटावर आणि पाठीवर जखमा आढळून आल्याचे सांगितले आहे. त्याने फिर्यादीला झालेल्या सर्व जखमा वस्तू क्र. अ सारख्या लाकडी काठीने होऊ शकत असल्याचे सांगून त्याला डोक्याच्या जखमेबाबत सिटी स्कॅन करण्याचा व डोळयाच्या व मांडीच्या जखमेबाबत एक्स–रे काढण्याचा सल्ला दिल्याचे सांगितले आहे. त्याने उलट तपासामध्ये, फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे घटनेची माहिती लिहिलेली असून वैद्यकीय प्रमाणपत्रात जखमांचा उल्लेख केलेला नसल्याचे मान्य करुन त्या कठीण पृष्ठभागावरती घसरल्यामुळे होऊ शकत असल्याचे मान्य केले आहे.

**१२**. तपासी अंमलदार पांडुरंग (सा.क्र.७) याने सदर गुन्हयाचा तपास मिळाल्यानंतर दि.३०.०६.२०२२ रोजी फिर्यादीने दाखवलेल्या घटनास्थळाचा पंचनामा करुन आरोपींनी गुन्हयात वापरलेला कोळप्याचा लाकडी दांडा जप्त केल्याचे सांगितले आहे. त्याने पुढे, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतल्यावर जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केल्यावर मिळून आलेल्या पुराव्यावरुन दोषारोप पत्र दाखल केल्याचे सांगितले आहे. त्याने उलट तपासामध्ये, घटनेच्या दिवशी आरोपी जनावरे खरेदी करण्यासाठी निंगुडगे येथे गेल्याचे मान्य करुन फिर्यादी त्याच्या जनावरांना पाणी पाजण्यासाठी घेऊन जात असताना आरोपींच्या म्हैशीने बुजल्यामुळे त्याला ढकलत नेल्यामुळे तो जखमी झाल्याचे नाकारुन इतर प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

**१३.** सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १३४ प्रमाणे केवळ साक्षीदारांची संख्या महत्त्वाची नसून साक्षीदारांच्या पुराव्याचा विचार करता घटना घडल्याचे सिद्ध होत असल्याचा युक्तिवाद केला आहे. त्यांनी फिर्यादी व वैद्यकीय अधिका–याचा पुरावा एकमेकांस पूरक असून तो नाकारण्यायोग्य आरोपींचा बचाव सिध्द झालेला नसून त्यांना घटनेबबत संशय निर्माण करता आलेला नाही. त्यांनी पुढे, घटनेच्या दिवशी आरोपी फिर्यादीच्या गावात आल्याची बाब आरोपींनी फिर्यादीला त्याच्या उलट तपासा दरम्यान विचारलेल्या प्रश्नातून सिध्द झालेली आहे. तसेच घटनेच्या दिवशी फिर्यादी व आरोपींमध्ये बोलाचाली झाल्याची बाब साक्षीदार मधुकर याच्या पुराव्यातून पटलावरती आलेली आहे. सबब, आरोपींनी गुन्हा केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्यामुळे त्यांना नियमा प्रमाणे दंडीत करण्याची विनंती केली आहे.

**१४.** याउलट आरोपींचे विधिज्ञ श्री. डी. जे. देसाई यांनी, घटनेच्या दिवशी फिर्यादी त्याच्या म्हैशीला पाणी पाजण्यासाठी घेऊन जात असताना ती बुजून उधळल्यामुळे त्याला झालेल्या जखमांचा गैरफायदा घेण्यासाठी त्याने खोटी तक्रार केल्याचा युक्तिवाद केला आहे. त्यांनी सदर घटनेस फिर्यादी व्यतिरिक्त इतर कोणीही साक्षीदार नसून त्याच्या कथनाप्रमाणे असलेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार छाया व मधुकर यांनी घटना घडल्याची बाब नाकारलेली आहे. आरोपी जनावरांचे व्यापारी असून त्यांनी कोणाचेही पैसे बुडवलेले

नाहीत. वैद्यकीय अधिका−याने दिलेल्या प्रमाणपत्रावरुन झालेल्या जखमांची वेळ अथवा त्यांचे वय नमूद केलेले नाही. सबब, उपलब्ध पुराव्यांवरुन आरोपींवरील गुन्हा सिध्द होत नसल्यामुळे त्यांना संशयाचा फायदा देऊन निर्दोषमुक्त करण्याची विनंती केली आहे.

**१५**. पटलावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, सदर घटनेस फिर्यादी हा एकमेव साक्षीदार आहे. त्यामुळे त्याच्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, त्याने स्पष्टपणे आरोपींना विकलेल्या गायीची उर्वरीत रक्कम देण्यास त्यांनी टाळाटाळ केल्यामुळे त्यांच्याकडे पैशांची मागणी केली असता, आरोपी क्र.२ ने कोळप्याच्या लाकडी दांडक्याने डोक्यावर, डोळयावर व पायांवर मारहाण केल्याचे सांगितले आहे. जरी फिर्यादीच्या कथनांना छाया व मधुकर यांनी दुजोरा दिलेला नसला तरी वैद्यकीय अधिका−याच्या पुराव्यातून त्याला पृष्टी मिळत आहे. आरोपींनी वैद्यकीय अधिका−याने प्रमाणपत्रामध्ये फिर्यादीला झालेल्या जखमांचे वय नमूद केलेले नसल्यामुळे शंका निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने आरोपींचा बचाव विचारात घेता, घटनेच्या दिवशी फिर्यादी हा त्याच्या म्हशीने ओढून नेल्यामुळे जखमी झाला असून त्याचा गैरफायदा घेण्यासाठी त्याने खोटी तक्रार केली आहे. यावरुन घटनेच्या दिवशी फिर्यादीला जखमा झाल्या होत्या ही बाब सिध्द होत आहे. सबब, त्यामुळे केवळ वैद्यकीय अधिका−याने प्रमाणपत्रामध्ये जखमांचे वय व वेळ नमूद केली नसल्याची बाब फिर्यादीच्या पुराव्याबाबत शंका निर्माण करत नाही.

**१६**. फिर्यादीने त्याच्या पुराव्यामध्ये आरोपी क्र.१ व २ यांनी त्याला तुझे कुठले पैसे असे म्हणून आरोपी क्र.२ ने कोळप्याच्या लाकडी दांडक्याने त्याच्या डोक्यावर दोन ते तीन वेळा मारुन त्याच काठीने डाव्या डोळयाजवळ आणि दोन्ही पायांवर मारल्याचे कथन करुन वस्तू क्र. अ वरील कोळप्याची काठी ओळखली आहे. आरोपींना त्याच्या उलट तपासा मधून सदर घटना नाकारावी अशी कोणतीही बाब पटलावरती आणता आलेली नाही. आरोपींनी त्यांची घटनास्थळावरील उपस्थिती विवादीत केलेली नाही. तसेच त्यांना खोटया गुन्हयात गोवण्यास फिर्यादीचा काय हेतू आहे याचा देखील आरोपींनी खुलासा केलेला नाही. आरोपींना फिर्यादी कडून गाय खरेदी केल्याची बाब मान्य असून त्यांनी

खरेदीची रक्कम किती व कोणासमक्ष दिली याबाबतचा देखील पुरावा पटलावरती आणलेला नाही.

**१७**. उपलब्ध पुराव्यावरुन आरोपी क्र.२ ने घटनेच्या दिवशी फिर्यादीला मारहाण केल्याची सिध्द होत असलेली बाब विचारात घेता, त्यांनी सदर गुन्हा आपसात संगनमत करुन गुन्हा केला आहे किंवा नाही याबाबत पटलावरील पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. भा. द. वि. सं. कलम ३४ साठी पुर्व नियोजन आणि समान उद्देश असल्याची बाब सिध्द होणे गरजेचे आहे. त्यासाठी आरोपींमध्ये घटनेपुर्वी पासून समान उद्वेश अथवा नियोजन असल्याचे सिध्द होणे गरजेचे नसून त्यांनी एकत्रीतपणे केलेली कृती देखील पुरेशी आहे. सदर खटल्यात आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीला केलेल्या मारहाणीमध्ये आरोपी क्र.२ ने लाकडी कोळप्याच्या दांडक्याने मारहाण केलेली आहे. फिर्यादीने तो शेतातून आल्यानंतर तेथे हजर असलेल्या आरोपींनी मारहाण केल्याचे कथन केलेले आहे. आरोपींनी देखील दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास ते निंगुडगे गावी आल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे सदर गुन्हा हा आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमताने केल्याचे निष्पन्न होत आहे.

**१८**. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपींनी त्याला कशाप्रकारे शिवीगाळी करुन जिवे मारण्याची धमकी दिली याबाबतचे कोणतेही कथन केलेले नसून त्यास इतर साक्षीदारांच्या पुराव्यातून देखील दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्यावरुन केवळ आरोपींनी घटनेच्या वेळी आपसात संगनमत करुन फिर्यादीला आरोपी क्र.२ ने ज्याने त्याचा मृत्यू संभव आहे अशा कोळप्याच्या लाकडी दांडक्याने दुखापत केल्याचे सिध्द होत आहे. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण व त्याच्या हातून प्रक्षोभक कृती घडण्याच्या उद्देशाने शिवीगाळी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची बाब सिध्द होईल असा पुरावा पटलावरती आलेला नाही. सबब, हे न्यायालय मुद्दा क्र.१, ३ व ४ चे निष्कर्ष नाही असे नोंदवून मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होय असा नोंदवत आहे.

**मुद्दा क्र. ५ साठी –**

**१९.** मुद्दा क्र.१, ३ व ४ च्या निष्कर्षांचा विचार करता, आरोपीं विरोधात भा .द. वि. सं.

कलम ३२३, ५०४ आणि ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा सिध्द झालेला नसल्यामुळे त्यांची सदर दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष विचारात घेता, आरोपींनी भा. द. वि. सं. कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केल्याचे सिध्द झालेले असल्यामुळे हे न्यायालय त्यांना शिक्षेसाठी ऐकून घेत आहे.

**२०**. आरोपींनी त्यांच्या वयाचा आणि त्यांच्यावरील जबाबदा-यांचा विचार करता, त्यांच्या हातून प्रथमच गुन्हा घडलेला असल्यामुळे त्यांना कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली आहे. आरोपींच्या विधिज्ञांनी खटला निकाली निघण्यासाठी आरोपींनी कोणताही विलंब केलेला नसून त्यांच्या हातून प्रथमच गुन्हा घडलेला असल्यामुळे त्याच्या वयाचा आणि गुन्हयाच्या कारणाचा विचार करता त्यांना अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चा फायदा देण्याची विनंती केली आहे. याउलट सरकारी विधिज्ञांनी आरोपींनी कायदा हातात घेऊन गुन्हा केल्याची बाब विचारात घेता, त्यांना अपराधी परिविक्षा अधिनियमाचा कोणताही फायदा न देता नियमा प्रमाणे जास्तीत जास्त कारावास होऊन दंड करण्याची विनंती केली आहे.

**२१**. सरकारी विधिज्ञ व आरोपींच्या विधिज्ञांचा शिक्षेबाबत युक्तिवाद ऐकला. फिर्यादी व आरोपी हे आसपासच्या गावातील रहिवासी असून त्यांचा एकमेकांना पूरक असा व्यवसाय आहे. त्यांच्यातील वाद हा पैशांच्या किरकोळ कारणामुळे झालेला आहे. आज रोजी आरोपी क्र.१ चे वय ६२ वर्षे आणि आरोपी क्र.२ चे वय ३७ वर्षे आहे. त्यामुळे त्यांच्या वयाचा आणि त्यांच्यातील नातेसबंधांचा विचार करता, त्यांना शिक्षा देऊन कठीण गुन्हेगारांच्या संपर्कात ठेवून कोणताही हेतू साध्य होणार नाही. याउलट आरोपींनी निवडक अटी व शर्तीवरती अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ मधील तरतूदीचा फायदा दिल्यास त्यांच्या वर्तणूकीत सुधारणा होऊन त्यांच्यामधील नातेसंबंध सुधारण्यास मदत होऊ शकते. तसेच त्यांचा हा प्रथमच गुन्हा असल्यामुळे त्यांना अपराधी परिविक्षा अधिनियमाचा अनुतोष नाकारावा अशी कोणतीही बाब पटलावरती आलेली नाही.

**२२**. सबब, गुन्हयाच्या स्वरुपाचा विचार करता, आरोपींना अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ मधील कलम ४ अंतर्गत पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी जिल्हा

परिविक्षा अधिकारी, कोल्हापूर यांच्या देखरेखीमध्ये चांगल्या वर्तनाच्या हमीवरती ठेवण्यासह कलम ५ प्रमाणे फिर्यादीला झालेल्या नुकसानासह दंडाबाबत ५,०००/– देण्याचे आदेशित करणे न्यायोचित ठरत आहे. त्याचबरोबर सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला कोळप्याचा लाकडी दांडा हा मूल्यहिन असल्यामुळे त्याच्या विल्हेवाटीचे आदेश देणे देखील आवश्यक आहे. सबब, वरील विवेचनावरुन हे न्यायालय मुद्दा क्र.५ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**आदेश –**

**१.** आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) प्रमाणे भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२३, ५०४, ५०६ सह ३४ मधील गुन्हयातून निर्दोषमुक्त करण्यात येते.

**२.** आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (२) प्रमाणे भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४ सह ३४ मधील गुन्हयासाठी दोषी ठरविले जाऊन त्यांना ताबडतोब शिक्षा देण्याऐवजी अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ च्या कलम ४ नुसार चांगल्या वर्तणुकीच्या हमीवरती १ वर्षाच्या परिविक्षा कालावधी करीता १५,०००/– रुपयांच्या जामीनावरती सोडण्यात येते.

**३.** आरोपींना अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ च्या कलम ५ नुसार फिर्यादीला झालेल्या नुकसानासह दंडाबाबत ५,०००/– रुपये देण्याचे आदेशित करण्यात येते.

**४.** आरोपींनी अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ च्या कलम ५ नुसार जमा केलेली ५,०००/– रुपये दंडाची संपुर्ण रक्कम अपिल कालावधीनंतर फिर्यादीला अथवा अपिलाच्या आदेशा प्रमाणे देण्यात यावी.

**५.** आरोपी हे पुढील एक वर्ष जिल्हा परिविक्षा अधिकारी, कोल्हापूर व त्यांच्या बदलीनंतर नियुक्त करण्यात आलेल्या अधिका–याच्या देखरेखी खाली राहतील.

**६.** आरोपींनी परिविक्षाधीन कालावधीमध्ये स्वतःला इतर भांडणांमध्ये सहभागी

होण्यापासून दुर राहून १ वर्षाच्या कालावधीमध्ये कोणताही गुन्हा करु नये.

७. आरोपींनी घालुन दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास त्यांना दोषी ठरविण्यात आलेल्या अपराधाची शिक्षा भोगण्यासाठी न्यायालया समक्ष हजर रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

८. आरोपींना व त्यांच्या विधिज्ञांना घालुन दिलेल्या अटी व शर्तींचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

९. सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला कोळप्याचा लाकडी दांडा मूल्यहिन असल्यामुळे तो अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करावा.

१०. आदेशाची प्रत परिविक्षाधीन अधिकारी व आरोपींना विनामुल्य देण्यात येऊन फिर्यादीला मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्यामार्फत पाठवण्यात यावी.

११. या आदेशाच्या अनुषंगाने आरोपींनी खटल्याच्या सुनावणी वेळी दिलेले जामिन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**( आर. पी. थोरे )**
(न्या. अ. सां. क्र. ०२८९७)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
आजरा.

दिनांक – ११.०४.२०२६.
ठिकाण – आजरा.

**फौजदारी नियमावलीच्या परिच्छेद ४४ (३) परिशिष्ट ६ प्रमाणे भाग – क.**

**परिशिष्ठ – साक्षीदारांचा आणि पुराव्यातील कागदपत्रांचा तपशील –**

**१. सरकार पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी –**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | नि. क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| स.सा.क्र.१ | कृष्णा नाना देसाई | १३ | घटनास्थळ पंच |
| स.सा.क्र.२ | शिवाजी बापूसो सरदेसाई | १५ | घटनास्थळ पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| स.सा.क्र.३ | शिवराज भैरु मगदूम | २० | फिर्यादी |
| स.सा.क्र.४ | छाया गणपती परीट | २४ | साक्षीदार |
| स.सा.क्र.५ | मधुकर विठ्ठल देसाई | २५ | साक्षीदार |
| स.सा.क्र.६ | डॉ. ऋतूराज शशिकुमार पाटील | २७ | वैद्यकीय अधिकारी |
| स.सा.क्र.७ | पांडुरंग गोविंद गुरव | २९ | तपासी अंमलदार |

**२. सरकार पक्षातर्फे निशाणीकृत झालेल्या कागदपत्रांची यादी –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | नि.क्र. १४ | पंचनाम्यावरील स्वाक्षरी |
| २. | नि.क्र.२१ | फिर्याद |
| ३. | नि.क्र.२८ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | नि.क्र. ३० | लेखी आदेश |
| ५. | नि.क्र.३१ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |
| ६. | नि.क्र. ३२ व ३३ | साक्षीदारांच्या पुराव्यातील अधोरेखांकित भाग |
| ७. | नि.क्र. ३४ | वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिलेले पत्र |

**३. आरोपीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी –**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| | निरंक | |

**४. आरोपीतर्फे निशाणीकृत आणि मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| | निरंक | |

**५. न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची व निशाणीकृत कागदपत्रांची यादी –**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव / निशाणी क्रमांक | पुराव्याचे /कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|

निरंक

**६. महत्वाच्या वस्तु/(मटेरिअल ऑब्जेक्ट) –**

| अनु.क्र. | वस्तू क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | वस्तू क्र. 'अ' | एक कोळप्याचा लाकडी दांडा |

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**( आर. पी. थोरे )**
(न्या. अ. सां. क्र. ०२८९७)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
आजरा.

दिनांक – ११.०४.२०२६.
ठिकाण – आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते